# श्री भैय्याजी पांढरीपांडे, नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क
## हनुमान नगर, नागपूर
## Sexual Harassment Complaint Cell
## Annual Report- 2020-21

---

**<u>Sexual Harassment Complaint Cell Commitee</u>**

| | |
|---|---|
| Dr. Nanda Pangul - President | Ku. Sakshi Deotale -( Member)- B.S.W.- I |
| Mrs. Shubhangi Tule-Secretary | Ku Kalyani Gourkar -( Member)- B.S.W.- II |
| Dr. Seema Lobo - Member | Ku. Tanushri Jawane- ( Member)- B.S.W.- III |
| Dr. Pournima Ganthde | Ku. Sakshi Lacherwar -( Member)- M.S.W.- I |
| Dr. Rekha Jagnale | Ku. Payal Yerne -( Member)- M.S.W.- II |

२०२०—२१ या सत्रामध्ये Sexual Harassment Complaint Cell अंतर्गत खालील उपक्रम राबविण्यात आले :—

**उद्‌बोधन कार्यक्रम**: कोरोनासाथी मुळे महाविद्यालयाचे सत्र उशिरा सुरू होऊन ऑनलाइन सुरू झाले त्यामुळे सर्व माहिती विद्यार्थ्यांन ऑनलाइन पध्दतीने देण्यात आली. प्रत्येक वर्गाच्या उद्‌बोधन कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची माहिती देतांना प्रा. डॉ. नंदा पांगुळ यांनी Sexual Harassment Complaint Cell बद्दल माहीती दिली. अशाप्रकारची कोणतीही बाब आढळल्यास किंवा जाणवल्यास संबंधीत प्राध्यापकांकडे माहिती देण्याची तसेच ऑफीस जवळ व ग्रंथालयात बसवलेल्या तक्रार पेटीसंबंधीचीमाहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

## Good Touch & Bad Touch komal Short Film-दि. २४/०९/२०२०

समाजामध्ये लैंगिक अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. BSW भाग I च्या विद्यार्थ्यांना शालेयविद्यार्थ्यासोबत क्षेत्रकार्य करीत असतांना Good Touch & Bad Touch काय असतो व त्याविषयी शालेय विद्यार्थ्यांना कसे समजावुन सांगता येईल यासाठी महाविद्यालयामध्ये बी एस डब्ल्यू भाग I च्या विद्यार्थ्यांना 'komal' ही शॉर्ट फील्म दाखविली. त्यानंतर त्यावर ऑनलाईन चर्चा घेण्यात आली. डॉ नंदा पागुळ यांनी 'komal' लघुपटाच्या आधाराने समाजात लैंगिक शोषणाची घडलेली अनेक उदाहरणे विद्यार्थ्यांना सांगितली यामध्ये समाजकार्यकर्त्याची भुमिका कशी रहायला पाहिजे तसेच चाईल्ड लाईन सेवेविषयी माहीती दिली. कार्यक्रमामध्ये १२ मुली आणि ७ मुले म्हणजेच १९ विद्यार्थी सहभागी झाले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील BSW-I चे विद्यार्थी उपस्थित होते.

**बालकांचे अधिकार Short film** दि. ०४/१२/२०२०

BSW भाग १ च्या विद्यार्थ्यांना शालेय विद्यार्थ्यांसोबत क्षेत्रकार्य करतांना त्यांना बालकांच्या हक्कांची माहिती असावी. ते हक्क त्यांना मिळवुन देण्यासाठी स्वत;तयार असावे यादृष्टीने बालकांचे हक्क ही शॉर्ट फील्म दाखविण्यात आली. त्यानंतर डॉ. नंदा पांगुळ यांनी PPT द्वारा बाल हक्क कोण कोणते आहेत हे सादर केले त्यांनतर यावर विद्यार्थ्यांमध्ये ऑनलाइन गटचर्चा घेण्यात आली. कार्यक्रमामध्ये १२ मुली आणि ७ मुले म्हणजेच १९ विद्यार्थी सहभागी झाले.

**लैगिंक अत्याचार: आम्ही काय करू शकतो? दि. २५/०२/२०२१**

बरेच वेळा लैंगिक समाजामध्ये लैगिक अत्याचार म्हणजे नेमके काय? हे माहिती नसते. त्यामुळे लैंगिक अत्याचार/छेडछाड कशाला म्हणायचे, लैंगिक अत्याचार झाल्यास कुणाची मदत मागायची भारतामध्ये यासंदर्भात कोणकोणते कायदे आहेत? लैगिंक अत्याचार प्रतिबंधसाठी मुलांनी आणि मुलींनी कसे वागायला पाहिजे यावि वीषयी डॉ नंदा पांगुळ यांनी माहिती दिली. समूदायामध्ये देखिल त्या संदर्भात जाणीव जागृती करावी असे सांगण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन साक्षी लाछरवार यांनी तर अभार प्रदर्शन काजल चचार्ण यांनी केले. कार्यक्रमासाठी १५ मुली आणि ८ मुले म्हणजेच २३ विद्यार्थी उपस्थित होते.

लिंगभाव समानता : दि. ०८/०३/२०२१

बी एस डब्ल्यू भाग १ मध्ये आलेले विद्यार्थी हे पौगांडावस्थेतील असतात. वेगवेगळया शाळांमधून वेगवेगळया गावांमधून व वेगवेगळया वातावरणातुन आलेले असतात.महाविद्यालयातील वातावरण त्यांच्यासाठी नवीन असते. त्यांच्यामधील भेदभावाची दरी कमी करण्यासाठी व शाळामधुन क्षेत्रकार्य कमी करण्यासाठी ते चांगले तयार व्हावे. यासाठी MEENA ही लिंग भाव समानता या विषयावर आधारित फील्म त्यांना दाखविण्यात आली. आणि त्यांनतर डॉ. नंदा पांगुळ यांनी लिंग भाव समानता याविषयी त्यांना माहिती दिली व सोबतच विद्यार्थ्यांमध्ये ऑनलाइन गटचर्चा घडवून आणली. या कार्यक्रमामध्ये ९ मुली आणि ३ मुले उपस्थित होती.

Dr. A. S. Barde
Officiating Principal
B. P. National Institute of Social Work
Hanuman, Nagar, Nagpur.